# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले (अर्थसंकल्प) अधिवेशन, २०२६

---

### अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

### प्रश्नांची एकूण संख्या - २०

---

### मुंबई येथील जमनालाल बजाज व्यवस्थापन शिक्षण संस्थेतील अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेत विद्यार्थ्यावर अन्याय झाल्याबाबत

**(१) २१५ (२४-०४-२०२५) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जमनालाल बजाज व्यवस्थापन शिक्षण संस्था, मुंबई यांच्या MHRD २०२३-२५ अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेत अन्याय झालेल्या एका विद्यार्थ्याने न्याय मिळण्यासाठी सर्व पुराव्यानिशी संचालक, जमनालाल बजाज व्यवस्थापन शिक्षण संस्था, शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग, तसेच मुंबई विद्यापीठातील संबंधित अधिकाऱ्यांकडे गेले दीड वर्ष पाठपुरावा करूनही त्याला अद्यापपर्यंत न्याय मिळाला नसल्याचे दिनांक १२ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित विद्यार्थ्याने केलेल्या तक्रारीची दखल घेऊन मा.राज्यपाल महोदयांच्या कार्यालयाकडून कुलगुरू, मुंबई विद्यापीठ यांच्याशी दिनांक २८ एप्रिल, २०२३, दिनांक ८ नोव्हेंबर, २०२३ व दिनांक १९ डिसेंबर, २०२३ रोजी पत्रव्यवहार करण्यात आला असतानाही जमनालाल बजाज व्यवस्थापन शिक्षण संस्थेच्या MHRD २०२३-२५ अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेत झालेल्या अनियमिततेची सखोल चौकशी करण्यात विद्यापीठ प्रशासन अपयशी ठरले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने देखील विद्यापीठ स्तरावर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल मुंबई विद्यापीठाकडून वेळोवेळी मागविलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे आणि जमनालाल बजाज व्यवस्थापन शिक्षण संस्था, मुंबई यांच्या MHRD २०२३-२५ अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेत अन्याय करण्यात आलेल्या संबंधित विद्यार्थ्याला न्याय मिळवून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१०-०३-२०२६) :** (१) व (२) हे खरे नाही.

जमनालाल बजाज व्यवस्थापन शिक्षण संस्था, मुंबई येथे MHRD (२०२३-२५) या दोन वर्षांच्या पूर्णकालिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया, लेखी परीक्षा, गटचर्चा व प्रत्यक्ष मुलाखत या निकषांनुसार गुणवत्तेच्या आधारे पारदर्शक पध्दतीने राबविण्यात आली आहे. संबंधित विद्यार्थ्याने केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने उपलब्ध नोंदी व प्रक्रियेची पडताळणी करण्यात आली असता प्रवेश प्रक्रियेत कोणतीही अनियमितता आढळून आलेली नाही. सबब, सदर विद्यार्थ्यावर प्रवेश प्रक्रियेत अन्याय झाल्याचे आढळून आलेले नाही.

(३) हे खरे आहे.

(४) प्रवेश प्रक्रिया ही गुणवत्तेनुसार (Merit) व शासनाच्या प्रचलित नियमांनुसार राबविण्यात आलेली आहे.

संबंधित विद्यार्थ्यास २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात MH-CET द्वारे ४४.३३ टक्के गुण प्राप्त होऊन मुंबई येथील Allana Institute of Management Studies येथे MMS अभ्यासक्रमास प्रवेश मिळालेला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील विद्यापीठांमध्ये सहाय्यक प्राध्यापकांच्या नियुक्तीसाठी स्वतंत्र आयोग निर्माण करणेबाबत

**(२) १४४६ (२४-०४-२०२५) अॅड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विद्यापीठांमध्ये सहाय्यक प्राध्यापकांच्या नियुक्तीसाठी स्वतंत्र आयोग निर्माण करणे हे विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमावलीचे उल्लंघन करणारे असून इतर राज्यात कुठेही प्राध्यापक भरतीसाठी स्वतंत्र आयोगाची स्थापना झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सहाय्यक प्राध्यापकांच्या नियुक्तीकरीता स्वतंत्र आयोग निर्माण करण्याची मागणी युजीसीने फेटाळली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सहाय्यक प्राध्यापकांच्या नियुक्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (०६-०३-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) शासन निर्णय दिनांक ११/०२/२०२६ नुसार अध्यापकांच्या निवडीसाठी सुधारीत कार्यपध्दती विहित करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उध्दवत नाही.

---

## मुंबई विद्यापीठाच्या कलिना संकुलामध्ये विविध सोयीसुविधांचा अभाव असल्याबाबत

**(३) १६२१ (२४-०४-२०२५) श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या कलिना संकुलामध्ये विद्यार्थ्यांना सभा, आंदोलने, मोर्चे, उपोषणे व निदर्शने याबाबत घालण्यात आलेली बंदी मागे घेण्यात यावी, परीक्षार्थी विद्यार्थ्यांना परीक्षांचे हॉल तिकीट विहित वेळेत मिळण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात यावी तसेच वसतिगृहात वास्तव्य करणाऱ्या मुलींच्या सुरक्षिततेसाठी २४ तास कार्यरत वॉर्डनची व्यवस्था करण्यात यावी इत्यादी मागण्या एका राजकीय पक्षाच्या युवा सेनेच्या सिनेट सदस्यांनी मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री महोदय, मा.कुलगुरू, मुंबई विद्यापीठ यांच्याकडे दिनांक १५ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागण्यांच्या पूर्ततेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (०९-०३-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२) मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक १२ सप्टेंबर २०२४ च्या बैठकीतील ठरावानुसार, विद्यापीठ परिसरात कोणत्याही प्रकारचे आंदोलन, सभा, मोर्चा, उपोषण किंवा तत्सम कार्यक्रम आयोजित करण्यासाठी विद्यापीठ प्रशासनाची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक करण्यात आले असून, त्याबाबत दिनांक २० सप्टेंबर २०२४ रोजी परिपत्रक निर्गमित करण्यात आले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांनी याच आशयाचे परिपत्रक निर्गमित केले होते. त्या परिपत्रकाविरोधात मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे विविध संघटनांनी रिट याचिका दाखल केली; मात्र न्यायालयाने विद्यापीठाच्या सुरक्षेच्या दृष्टीने असे परिपत्रक योग्य असल्याचा निर्णय दिला.

मुंबई विद्यापीठाच्या परीक्षा पध्दतीत आमूलाग्र सुधारणा घडून आली असून तंत्रज्ञानाच्या मदतीने एक ते तीन महिन्याआधी आसन क्रमांक व प्रवेश पत्र उपलब्ध करून दिली जातात.

मुंबई विद्यापीठाच्या सर्व वसतिगृहात वॉर्डन नियुक्त करण्यात आले आहेत तसेच सर्व वसतिगृहात सुरक्षा रक्षक ही नियुक्त करण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागरिकांच्या मागास प्रवर्गाच्या राजकीय आरक्षणाबाबत

**(४) १९११ (२३-०४-२०२५) श्री.पंकज भुजबळ :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागरिकांच्या मागास प्रवर्गाच्या राजकीय आरक्षणासाठी नेमलेल्या समर्पित बांठिया आयोगाच्या अहवालातील त्रुटींवर उपाययोजना करून ओबीसींचे आरक्षण पूर्ववत करण्याची मागणी लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २१ जानेवारी २०२५ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री व मा.मंत्री (इतर मागासववर्गीय

कल्याण) यांचेकडे केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे (१०-०३-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सन्मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार तीन सूत्र तपासणी करून नागरिकांच्या मागास प्रवर्गाचे आरक्षण निश्चित करण्याबाबत बांठिया आयोगाने शासनास सादर केलेला अहवाल सन्मा. सर्वोच्च न्यायालयात सादर करण्यात आला व तो न्यायालयाने स्वीकृत केल्यानंतर दिनांक ०६/०५/२०२५ रोजी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या अंतरीम आदेशानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकसाठी ना.म.प्र. ला आरक्षण अनुज्ञेय करून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका दिनांक ०९/०२/२०२६ झाल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राष्ट्रीय आरोग्य धोरणानुसार राज्यातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्था सुधारण्यासाठी निधी उपलब्ध करुन रिक्त जागा भरणेबाबत

**(५) २१९० (२४-०४-२०२५) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रीय आरोग्य धोरणानुसार राज्याच्या एकूण अर्थसंकल्पाच्या ८ टक्के निधी सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेववर खर्च होणे अपेक्षित असताना सरासरी केवळ ४.९१ टक्के निधी खर्च होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गत ५ वर्षात सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेवरील अर्थसंकल्पात विशेष वाढ न झाल्यामुळे डॉक्टर, परिचारिका तसेच रुग्णालयीन कर्मचाऱ्यांची ४२ पदे रिक्त असून लोकसंख्येच्या तुलनेत रुग्णालये, आरोग्य केंद्रांची कमतरता आणि रुग्णालयांची दुरवस्था झाल्याचे भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक (कॅग) यांनी आपल्या अहवालात नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ही रिक्त पदे तातडीने भरण्याची शिफारस भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक (कॅग) यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, बृहत आराखड्यानुसार हाती घेण्यात आलेल्या नवीन रुग्णालयांच्या बांधकाम निधी अभावी ७० टक्के कामे अपूर्ण असून ज्या रुग्णालयांच्या आधुनिकीकरणाची कामे हाती घेण्यात आली होती त्यातील ९० टक्के कामे अपूर्ण आहेत तसेच जमीन उपलब्ध नसल्याने ४३३ रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रांची कामे सुरूच होऊ शकली नाहीत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास,उक्त प्रकरणी रिक्त पदे भरण्याबाबत व रुग्णांलयाना निधी उपलब्ध करुन त्यांचे आधुनिकीकरण करण्याबाबत तसेच ४३३ रुग्णालयांना जमीन उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर (०६-०३-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२) राज्यातील आरोग्य विभागात वैद्यकीय अधिकारी, परिचारिका आणि इतर कर्मचारी वर्ग यांची पदे काही प्रमाणात रिक्त आहेत. मात्र सदर रिक्त पदे भरण्याची कार्यवाही विभागामार्फत सतत सुरू आहे. सन २०२४-२०२५ च्या लोकसंख्येनुसार उपकेंद्र - आणि प्राथमिक आरोग्य केंद्र काही प्रमाणात कमी आहेत मात्र राज्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांचा अनुशेष भरुन काढण्याकरीता सन २०२४ च्या लोकसंख्येवर आधारीत नवीन आरोग्य संस्था स्थापनेचा जोडबृहत आराखडा तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) हे खरे आहे.

(४) व (५) पूर्णत्वास आलेल्या बांधकामास प्राधान्याने निधी उपलब्ध करून देऊन ते पूर्ण करण्याचे धोरण ठरविण्यात आले आहे. तसेच शासकीय वाढीव निधी, इतर स्त्रोत जसे १५ वा वित्त आयोग, हुडको या माध्यमातून निधी उभारून मंजूर बांधकामे पूर्ण करण्यात येत आहेत. तसेच नवीन रुग्णालयांकरीता जागा उपलब्ध करून बांधकामे सुरू करण्यात येत आहेत.

वैद्यकीय अधिकारी (एस-२३) व (एस-२०) या संवर्गातील रिक्त पदे सरळसेवा व पदोन्नतीने भरण्यात येत आहेत.

सन २०२३ च्या २५४५ पदांच्या जाहिरातीनुसार अधिपरिचारिका पदावर पात्र २३३१ उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात आले आहेत, त्याचप्रमाणे निमवैद्यकीय अधिकाऱ्यांची १९०९ पदांच्या जाहिरातीनुसार १८३३ उमेदवार उपलब्ध झाले आहेत, पैकी १७९३ उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात आले आहेत.

गट-क व ड संवर्गाच्या रिक्त १०९४९ पदांच्या भरतीसाठी प्रसिध्द जाहिरातीनुसार पात्र ९५२१ उमेदवारांची नियुक्ती करण्यात आली आहे.

बृहत आराखड्यानुसार नविन रुग्णालयांना जमीन उपलब्ध करुन देण्याकरीता संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

---

## रत्नागिरी जिल्ह्यातील किनारपट्टीजवळील गावांतील वीज वाहिन्या भूमिगत करण्याबाबत

**(६) २३७५ (१८-०७-२०२५) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **आपत्ती व्यवस्थापन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकण किनारपट्टीवरील जिल्ह्यात वारंवार येणाऱ्या नैसर्गिक आपत्तीमुळे होणारी जीवित आणि वित्तहानी कमी करण्यासाठी ‘कोकण आपत्ति सौम्यीकरण’ हा पाच हजार कोटींचा कार्यक्रम शासनाने हाती घेतला असून सदरहू कार्यक्रमातंर्गत कोकण किनारपट्टीवरील सर्व वीजवाहिन्या भूमिगत करण्यात येणार असल्याचे माहे मे,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रत्नागिरी जिल्ह्यात सदरहू कार्यक्रमातंर्गत किती कोटीच्या कामांना मंजूरी देण्यात आली आहे, तसेच जिल्ह्यात प्रस्तावित करण्यात आलेली कामे किती कालावधीत पूर्ण करण्याचे शासनाचे नियोजन असून या कामांची सद्य:स्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (०४-०३-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे. कोकण किनारपट्टीवरील ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदूर्ग, जिल्ह्यातील वीजवाहिन्या भूमिगत करण्यासाठी एकूण रुपये १८२४.७९ कोटी इतक्या खर्चाच्या कामास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आलेली आहे.
(२) व (३) रत्नागिरी जिल्ह्यातील वीजवाहिन्या भूमिगत करण्यासाठी एकूण रुपये २९९.९९ कोटी इतक्या खर्चास प्रशासकीय मंजूरी दिली असून सदर कामे सद्य:स्थितीत प्रगतीपथावर आहे.

---

## येवला (जि.नाशिक) येथील महात्मा जोतिबा फुले शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि नवीन शासकीय तंत्रनिकेतन संस्थेत अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी सुविधा देण्याबाबत

**(७) २४४६ (१८-०७-२०२५) श्री.पंकज भुजबळ, श्री.अमोल मिटकरी, श्री.इद्रिस नायकवडी :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महात्मा जोतिबा फुले शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येवला (जि.नाशिक) येथे अल्पसंख्यांक विद्यार्थी-विद्यार्थीनींसाठी आयटीआयची दुसरी-तिसरी पाळी सुरु करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ८ मार्च २०२५ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येवला (जि.नाशिक) येथे अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थी-विद्यार्थीनींसाठी नवीन शासकीय तंत्रनिकेतन संस्था सुरु करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २७ फेब्रुवारी २०२५ रोजी वा त्या सुमारास शासनाकडे मागणी केलेली आहे,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, येवला (जि.नाशिक) येथे अल्पसंख्याक विद्यार्थी-विद्यार्थीनींसाठी आयटीआयची दुसरी-तिसरी पाळी सुरु करण्यासाठी तसेच अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थी-विद्यार्थीनींसाठी नवीन शासकीय तंत्रनिकेतन संस्था सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.मंगलप्रभात लोढा (०२-०३-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) महात्मा जोतिबा फुले शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, येवला येथे एकूण १० व्यवसाय अभ्यासक्रमाच्या १८ तुकड्या सुरु आहेत. यामध्ये एकूण ४३२ प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण घेत आहेत. अल्पसंख्याक प्रशिक्षणार्थ्यांसाठी नवीन तुकड्या सुरु करण्यासाठी संस्थेत जागा उपलब्ध आहे. सदर जागेवर बांधकाम केल्यास अल्पसंख्याक प्रशिक्षणार्थ्यांसाठी मेकॅनिक डिझेल १ तुकडी व रेफ्रिजरेटर ॲण्ड एअर कंडिशनर टेक्निशियन २ तुकड्या अशा एकूण ३ तुकड्या सुरु करुन ६८ प्रशिक्षणार्थी यांना प्रशिक्षण देणे शक्य आहे.येवला जि.नाशिक येथे नवीन शासकीय तंत्रनिकेतन संस्था सुरु करण्याच्या अनुषंगाने सह संचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक यांनी ५ सदस्यीय समिती गठीत करुन कार्यवाही सुरु केली आहे. तसेच या प्रकल्पाकरीता जागा देण्याची मागणी जिल्हाधिकारी नाशिक यांच्याकडे केली आहे. याबाबत सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक व जिल्हाधिकारी यांचे स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खुलताबाद (जिल्हा छत्रपती संभाजीनगर) येथील कोहिनूर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाच्या चौकशीबाबत

**(८) २६०३ (१८-०७-२०२५) श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खुलताबाद (जि.छत्रपती संभाजीनगर) येथील कोहिनूर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाच्या संदर्भात अनेक तक्रारी प्राप्त झाल्यानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने एक समिती नेमून महाविद्यालयात आवश्यक पायाभूत सुविधा, प्राध्यापक नियुक्ती, इमारत व प्रयोगशाळा यासह इतर भौतिक सुविधांची तपासणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाविद्यालयाच्या चौकशीसाठी नेमलेल्या समितीने महाविद्यालयात १८ पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू असून त्या ठिकाणी फक्त १८ प्राध्यापकांची कागदपत्रे नियुक्ती केलेली असणे, प्रयोगशाळा ही अत्याधुनिक नसणे, तसेच सर्व विद्यार्थ्यांसाठी एकच प्रयोगशाळा असणे याशिवाय मैदान ट्रॅक्सवर इतर भौतिक सुविधांचा अभाव असल्याचे समितीने आपल्या अहवालात नमूद केलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,उक्त प्रकरणी विद्यापीठाच्या उप कुलगुरूंनी कोहिनूर महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाला सात दिवसात खुलासा सादर करण्याबाबत नोटीस दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने या महाविद्यालयावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१०-०३-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) होय, हे खरे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांनी कोहिनूर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाच्या संदर्भात प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यासाठी डॉ. भालचंद्र वायकर यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नियुक्त केली होती. समितीने सदर चौकशीबाबतचा अहवाल विद्यापीठाकडे दिनांक ०५/०३/२०२५ रोजी सादर केला. सदर अहवालातील निष्कर्षानुसार विद्यापीठाकडून संबंधित महाविद्यालयास सात दिवसाच्या आत खुलासा सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

(४) सदर चौकशी समितीच्या अहवालातील निष्कर्षाच्या अनुषंगाने महाविद्यालयाने खुलासा सादर न केल्याने, महाविद्यालयात चालविण्यात येणाऱ्या सर्व पदव्युत्तर अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून स्थगित करण्यात आली आहे. तसेच महाविद्यालयाचे नियमित प्राचार्य यांनी त्यांचे कर्तव्य व जबाबदाऱ्या पार पाडण्यात कसूर केल्याचे निदर्शनास आल्याने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १३ (१३)(च) अन्वये प्राचार्य पदाची मान्यता काढून घेण्यात आली आहे.

(५) संबंधित महाविद्यालयावर कारवाई करण्यात आली असल्याने विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील सर्व शाळांच्या संचमान्यता अद्ययावत करण्याबाबत

**(९) २६१८ (१८-०७-२०२५) श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शैक्षणिक सन २०२४-२५ पर्यंत शासनाच्या शालेय शिक्षण व ग्रामविकास विभागा अंतर्गत चालविल्या जाणाऱ्या जिल्हा परिषद शाळांच्या संच मान्यता अद्ययावत करण्यात आल्या आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यस, किती कालावधी पर्यंत सर्व शाळांच्या संच मान्यता अद्ययावत करण्यात येणार आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०२-०३-२०२६) :** (१) व (२) हे खरे आहे. राज्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांच्या संचमान्यता नोव्हेंबर २०२४ पर्यंत अद्ययावत करण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## धुळे जिल्ह्यातील निम्न पांझरा मध्यम प्रकल्प (अक्कलपाडा) पूर्ण क्षमतेने भरण्यासाठी भूसंपादन आणि निधीची तरतुद करण्याबाबत

**(१०) २८३९ (१८-०७-२०२५) श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे अक्कलपाडा, (ता.साक्री जि.धुळे) येथील निम्न पांझरा मध्यम प्रकल्प पूर्ण १०० टक्के भरण्यासाठी तृतीय सुधारित प्रशासकीय प्रस्ताव जलसंपदा विभागाकडे पाटबंधारे धुळे विभागाकडून सादर केल्याचे माहे मे,२०२५ वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावात धरण पूर्ण भरण्यासाठी वाढीव १९८ हेक्टर शेतजमीनीचे भूसंपादन करणे आवश्यक असून त्यासाठी जवळपास ४१० कोटी रुपये निधीच्या मंजूरीबाबत शासनाकडे मागणी करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रस्तावानुसार वाढीव १९८ हेक्टर शेतजमीनीचे भूसंपादन करुन ४१० कोटी निधी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.गिरीश महाजन (०४-०३-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे,

निम्नपांझरा (अक्कलपाडा) मध्यम प्रकल्प, ता.साक्री, जि.धुळे प्रकल्पाच्या तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्तावास शासन निर्णय दिनांक १२/०९/२०१६ अन्वये मान्यता प्राप्त आहे.

सदर प्रकल्पाचा रुपये ९६६.५९ कोटीचा चतुर्थ सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्तावावर कार्यवाही प्रगतीत आहे.

(२) अंशत: खरे आहे.

सदर प्रस्तावात धरण पूर्ण क्षमतेने भरण्यासाठी अंदाजित १९८ हेक्टर शेतजमीनीचे भूसंपादन करणे आवश्यक आहे. त्यासाठी अंदाजित रुपये ३४०.०० कोटी खर्च अपेक्षित असून प्रस्तावित चतुर्थ सुधारीत प्रशासकीय मान्यता अहवालात सदर तरतूद केलेली आहे.
(३) उक्त प्रस्तावानुसार वाढीव १९८ हेक्टर शेतजमीनीचे भूसंपादन करणेकामी प्रकल्पाच्या चतुर्थ सुधारीत प्रशासकीय मान्यता अहवाल अंतर्गत तरतुद केलेली असून दिनांक २७/११/२०२५ रोजी प्रस्ताव शासनास प्राप्त आहे व सुधारित प्रशासकीय मान्यता कार्यवाही प्रगतीत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जिल्हा परिषद शिक्षकांना त्यांच्या शाळेच्या गावी वास्तव्य करण्याच्या सक्तीबाबत

**(११) २८९८ (१८-०७-२०२५) श्री.जगन्नाथ अभ्यंकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात जिल्हा परिषदांमध्ये कार्यरत असलेल्या शिक्षकांना त्यांच्या शाळेच्या गावात राहणे बंधनकारक असून शिक्षकांची शाळांच्या गावामध्ये निवास व्यवस्था होऊ न शकल्यामुळे ते राहत असलेल्या गावावरून शाळेच्या गावी शाळेच्या वेळेत येत असल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर आणि अन्य उपक्रमावर कोणताही परिणाम होत नसल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शाळेच्या गावी मुक्कामी न राहिल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होते आणि शाळेच्या ठिकाणी गावात राहिल्यामुळे विद्यार्थ्यांना त्यामुळे बराच लाभ होतो याबाबत शासनाकडून अभ्यास/ सर्वेक्षण करण्यात आले आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास शाळेच्या गावात भाड्याची घरे उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच नजीकच्या गावावरून जाणे येणे करण्याची सुलभता आणि यामुळे विद्यार्थ्यांचे कोणतेही शालेय अथवा सहशालेय कार्यक्रमातील नुकसान होत नसल्याने शिक्षकांना मुख्यालयी राहण्याची अट शिथिल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.जयकुमार गोरे (०६-०३-२०२६) :** (१) ते (४) जिल्हा परिषद शिक्षकांना शाळेच्या गावात राहण्याच्या अनुषंगाने ग्रामविकास विभाग व शालेय शिक्षण विभाग यांच्याकडून सर्वेक्षण करण्यात आलेले नाही. ग्रामीण भागातील कर्मचाऱ्यांनी मुख्यालयी राहण्याबाबत पंचायत राज समितीने केलेली शिफारस विचारात घेऊन ग्रामविकास विभागाच्या दिनांक ०९ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये ग्रामीण भाागातील जिल्हा परिषदेतील कर्मचारी मुख्यालयी राहण्याकरीता ठोस उपाययोजना करण्यासाठी प्राथमिक शिक्षक, पदवीधर शिक्षक, मुख्याध्यापक, ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी, आरोग्य सेवक व आरोग्य सहायक मुख्यालयी राहत असल्यासंबंधी संबंधित ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेचा ठराव बंधनकारक करण्यात आला आहे. त्यानुसार जिल्हा परिषद शिक्षकांनी मुख्यालयी राहणे आवश्यक आहे. मुख्यालयी राहण्याची अट शिथील करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन नाही.

---

## मंगळवेढा येथील जगज्योती महात्मा बसवेश्वर स्मारक प्रलंबित असल्याबाबत

**(१२) ३३५० (१७-०७-२०२५) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :- (१) सोलापुर जिल्ह्यातील मंगळवेढा (येथे जगज्योती महात्मा बसवेश्वर महाराजांचे स्मारक प्रस्तावित असून गत १२ वर्षापासून समिती स्थापन न झाल्याने सदर स्मारकाच्या जागेअभावी स्मारकाचा प्रस्ताव प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित स्मारकासाठी सुरुवातीस पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली जगज्योती महात्मा बसवेश्वर स्मारक समिती स्थापन झाली ती रद्द होऊन नंतर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली नवीन समिती स्थापन झाली ती देखील रद्द केली असून स्मारकाचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयात प्रलंबित आहे हे खरे आहे काय?

(३) असल्यास, नवीन समिती किंवा प्राधिकरण स्थापन करून स्मारकाचा आराखडा व जमीन उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.जयकुमार गोरे (०२-०३-२०२६) :** (१), (२) व (३) मंगळवेढा जि.सोलापूर येथे महात्मा बसवेश्वर महाराजांचे स्मारक उभारण्यास शिफारस करण्यासाठी सन २०१७ मध्ये तत्कालीन पालकमंत्री, सोलापूर यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेली समिती रद्द करून, सन २०२२ मध्ये जिल्हाधिकारी, सोलापूर यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली. जिल्हाधिकारी, सोलापूर यांचे अध्यक्षतेखालील समितीतील अशासकीय सदस्यांच्या नियुक्तीबाबत काही राजकीय पक्षांनी आक्षेप घेतल्यामुळे, सदर समिती सन २०२२ मध्ये रद्द करण्यात आली.

मा.मंत्री (ग्रामविकास) यांचे अध्यक्षतेखालील दिनांक १५/०७/२०२५ रोजीच्या बैठकीमध्ये स्मारकाकरीता मंगळवेढा येथील चोखामेळा ग्रामपंचायत हद्दीतील कृष्णा तलावाशेजारील जागा अंतिम करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी, सोलापूर यांना देण्यात आले आहेत. तसेच सदर बैठकीतील निर्णयानुसार, विभागाच्या दिनांक ०३/१०/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये मा.मंत्री (ग्रामविकास) यांचे अध्यक्षतेखाली स्मारक समिती गठीत करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## हिवर (संगम) (ता.महागाव, जि.यवतमाळ) या तीर्थक्षेत्राला “ब” दर्जाचे तीर्थक्षेत्र म्हणून घोषित करण्याबाबत

**(१३) ३६३४ (१८-०७-२०२५) श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिवर (संगम) (ता.महागाव, जि.यवतमाळ) पूस नदीच्या किनाऱ्यावर बसलेल्या एकविरा देवी संस्थान या तीर्थक्षेत्राला “ब” दर्जाचे तीर्थक्षेत्र म्हणून घोषित करण्याची मागणी गत अनेक वर्षापासून भाविकांसह स्थानिक नागरीकांकडून शासनाकडे होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे (२८-०२-२०२६) :** (१) व (२) एकविरा देवी संस्थान हिवर (संगम), ता.महागाव, जि.यवतमाळ या देवस्थानास ब वर्ग दर्जा मिळण्याबाबत शासनास मागणी पत्र प्राप्त नाही. तथापि, ग्रामविकास विभागामार्फत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ योजना "ब" वर्ग राबविण्यात येते. या योजनेतंर्गत ग्रामविकास विभाग शासन निर्णय दिनांक १६/११/२०१२ मध्ये नमूद निकषांची पूर्तता करून प्रस्ताव विभागास प्राप्त झाल्यास देवस्थानास "ब" वर्ग दर्जा देणेबाबतची कार्यवाही करण्यात येते. एकविरा देवी संस्थान हिवर (संगम), ता.महागाव, जि.यवतमाळ या तीर्थक्षेत्रास "ब" वर्ग दर्जा देणेबाबतचा प्रस्ताव अद्याप विभागास अप्राप्त आहे.

उपरोक्त नमूद शासन निर्णयातील निकषांची पूर्तता करून प्रस्ताव विभागास प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करणे शक्य आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## हस्तकला प्रशिक्षकांची सेवा कायम करण्याबाबत

**(१४) ४१०९ (१८-०७-२०२५) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हस्तकला प्रशिक्षकांची ५८५७ पदे खाजगी कंपनीमार्फत भरण्याचा कौशल्य विकास विभागाचा शासन निर्णय महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने रद्द करून सलग पाच वर्ष ताशी वेतनावर काम करणाऱ्या प्रशिक्षकांची सेवा कायम करण्याचे आदेशही महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने शासनाला दिले असल्याची बाब माहे मार्च, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सलग पाच वर्ष ताशी वेतनावर काम करणाऱ्या हस्तकला प्रशिक्षकांची सेवा कायम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा (०२-०३-२०२६) :** (१) ते (३) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांच्या अधिपत्याखालील असलेल्या संस्था व कार्यालयांमध्ये हस्तकला प्रशिक्षक असे कोणतेही पद अस्तित्वात नाही. तथापि, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये विविध शिल्प निदेशकांच्या रिक्त पदांवर तासिका तत्वावर निदेशक कार्यरत आहेत.

मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, खंडपीठ मुंबई यांनी त्यांच्यातील मूळ अर्ज क्र. ४८१/२०२३ व इतर यावर दिनांक २७/०३/२०२५ रोजी अंतरिम आदेश दिले आहेत. सदर आदेशान्वये कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचा दिनांक ७/०४/२०२२ चा शासन निर्णय रद्द करुन शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये ५ वर्ष काम करणाऱ्या मूळ अर्जामधील अर्जदारांच्या सेवा नियमित करण्याचे आदेश दिले आहेत. तथापि, सदरहू दिनांक २७/०३/२०२५ रोजीच्या अंतरिम आदेशाच्या विरोधात मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका (स्टँप) क्र. २०४७६/२०२५ अन्वये अपील दाखल करण्यात आले आहे. सदरची बाब मा.उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे. तथापि, तासिका तत्वावरील ५ वर्षे सलग सेवा झालेल्या प्रशिक्षकांना नियमित करता येईल किंवा कसे याबाबत शासन स्तरावर विचारविनिमय सुरु आहे.

---

## मुंबई विद्यापीठाने महाविद्यालयांची प्रथम वर्षाची सन २०२५-२६ प्रवेश प्रक्रिया थांबविण्याचा निर्णय घेतल्याबाबत

**(१५) ४१६० (१८-०७-२०२५) अॅड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.वसंत खंडेलवाल, श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नॅक ॲक्रिडीएशनची (राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषद (National Assessment and Accreditation Council), ची प्रक्रिया आणि महाविद्यालय विकास समितीची (सीडीसी) स्थापना न केल्यामुळे मुंबई विद्यापीठाने २२९ महाविद्यालयांची प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रिया या वर्षापासून थांबविण्याचा निर्णय घेतला असल्याचे माहे मे,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नॅक ॲक्रिडीएशनची प्रक्रिया आणि महाविद्यालय विकास समितीची (सीडीसी) स्थापना न करण्याची कारणे काय आहेत तसेच विद्यापीठाने या महाविद्यालयांना १० हजार रुपये दंड केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नॅक ॲक्रिडीएशनची प्रक्रिया पूर्ण करून तसेच महाविद्यालय विकास समितीची (सीडीसी) स्थापना करून प्रवेश प्रक्रिया सुरळीत सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (०९-०३-२०२६) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

मुंबई विद्यापीठाने एप्रिल- मे, २०२५ च्या सूचना पत्रांद्वारे मुंबई विद्यापीठाशी संलग्नित २२९ महाविद्यालयांना नॅक/ एनबीए अधिस्वीकृती आणि पुनर्अधिस्वीकृती तसेच महाविद्यालय विकास समितीची (सीडीसी) स्थापना न केल्यामुळे त्यांची प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रिया २०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षापासून स्थगित केल्याचे तसेच सदर महाविद्यालयांना रुपये १०,०००/- (रूपये दहा हजार मात्र) दंड आकारण्यात आल्याचे सूचित केले होते.

(३) नॅक, बंगलोर संस्थेकडून उच्च शिक्षण संस्थांसाठीचे लॉगीन पोर्टल अद्ययावत करण्याची प्रक्रिया सुरु असल्याने महाविद्यालयांना नॅक अधिस्विकृती व पुनर्अधिस्विकृती नोंदणी करता येणे शक्य होत नसल्याची बाब विचारात घेऊन व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेऊन संबंधित महाविद्यालयांना नॅक मुल्यांकन/ पुनर्मुल्यांकन करणेकरीता ६ महिन्यांची मुदत प्र. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या दिनांक २२ मे २०२५ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आली आहे. त्यानुसार, मुंबई विद्यापीठाने दिनांक २३ मे २०२५ रोजीच्या परिपत्रकान्वये सदर महाविद्यालयांना त्रुटी पूर्ततेकरीता सहा महिन्यांची मुदतवाढ देऊन स्थगित केलेले प्रवेश पूर्ववत सुरू केले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बुलढाणा जिल्ह्यात जलजीवन मिशन अंतर्गत हर घर नल योजनेची कामे अपूर्ण असल्याबाबत

**(१६) ४६४६ (२२-०९-२०२५) श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील जलजीवन मिशन अंतर्गत हर घर नल योजना राबविण्यात येत असून जिल्ह्यातील पाच तालुक्यांतील २१ गावांमध्ये पाणीपुरवठा करणाऱ्या पाइपलाईनची निधी अभावी कामे प्रलंबित असून बहुतांश भागात कामे बंद आहे तर काही गावांमध्ये कामाचे नियोजन नसल्याने येथील कामे निकृष्ट दर्जाची होत असल्याने बुलढाणा जिल्ह्यात प्रत्येक घरांमध्ये नळ योजना पोहचत नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बुलढाणा जिल्ह्यातील घाटावरील पाच तालुक्यातील उक्त २१ गावांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बुलढाणा जिल्ह्यातील घाटावरील व घाटाखालील सर्व तालुक्यांमध्ये हर घर नल ही योजना यशस्वीपणे राबवण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील (०५-०३-२०२६) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे,

बुलढाणा जिल्ह्यात जल जीवन मिशन अंतर्गत एकूण १४७३ योजना प्रस्तावित असून ५५६ योजनांची कामे पूर्ण झालेली आहे. उर्वरित ९१७ योजनांची कामे प्रगतीपथावर आहे. माहे ऑक्टोबर, २०२४ पासून केंद्र शासनाकडुन निधी उपलब्ध झालेला नाही. जलजीवन मिशन अंतर्गत योजनांच्या कामावर विपरीत परिणाम होऊ नये म्हणुन राज्य शासनातर्फे विशेष बाब म्हणुन सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये रुपये २३६६.५४ कोटी निधी वितरीत करण्यात आला असून बुलढाणा जिल्ह्यासाठी रुपये १०८.९५ कोटी निधी वितरीत करण्यात आला आहे. त्यामुळे योजनांच्या प्रलंबित कामांना गती मिळण्यास मदत होणार आहे.

तथापि, सदर गावातील पाणीपुरवठा योजनांचे कामे निकृष्ट झालेली नाहीत.ज्या ठिकाणी कामे विहीत मानकांप्रमाणे झाल्याचे दिसून येत नाही ती कामे संबंधित ठेकेदारांकडून त्यांचे खर्चामधून मानकांप्रमाणे पुन्हा करण्यात येतात.

(२) होय, हे खरे आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील प्रगतीपथावरील योजनेमध्ये अस्तीत्वातील पाण्याच्या स्त्रोतांमधून पाणीपुरवठा सुरू असून, टंचाई कालावधीमध्ये ज्या ठिकाणी उपलब्ध स्त्रोताद्वारे पाणीपुरवठा नियमीत होत नव्हता, अशा गावांमध्ये माहे एप्रिल,२०२५ ते जून, २०२५ मध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात आला आहे. सद्य:स्थितीत या गावांना नळ पाणीपुरवठा योजनांद्वारे नियमित पाणीपुरवठा सुरू आहे.

(३) जल जीवन मिशन अंतर्गत नळ पाणीपुरवठा योजनांची कामे मुदतीत पूर्ण करण्याबाबत सर्व संबंधित अधिकारी व कंत्राटदार यांना सूचित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## विद्यानिकेतन हायस्कूल, मार्वे रोड, मालाड (प), मुंबई येथील चुकीच्या संचमान्यतेबाबत

**(१७) ४६६१ (०१-११-२०२५) श्री.जगन्नाथ अभ्यंकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विद्यानिकेतन हायस्कूल, मार्वे रोड, मालाड (प), मुंबई या शाळेकरीता सन २०१२- १३ ते सन २०१८-१९ पर्यंत १० शिक्षकांची पदे संच मान्यतेमध्ये मंजूर होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळेला सन २०२२-२३ च्या संचमान्यतेमध्ये ९ आणि दिनांक १ ऑगस्ट, २०२४ च्या आदेशानुसार सन २०२३ - २४ करीता सुध्दा ९ शिक्षकांची पदे मंजूर दर्शविण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासन निर्णय दिनांक २८ ऑगस्ट, २०१५ आणि दिनांक १५ मार्च २०२४ नुसार सदर शाळेला सन २०२३-२४ आणि सन २०२४-२५ च्या संच मान्यतेमध्ये ९ पदे मंजूर करण्यात आली असूनही दिनांक १८ मार्च, २०२५ च्या सुधारीत संचमान्यतेमध्ये २०२३-२४ करीता ६ मंजूर पदे दर्शविण्यात आली असून सदर शाळेतील संचमान्यता दुरूस्त करण्याचे दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०२-०३-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे.

व (२) विद्यानिकेतन हायस्कूल, मार्वे रोड, मालाड (प), मुंबई या माध्यमिक शाळेच्या सन २०१४-१५ च्या ऑनलाईन संच मान्यतेनुसार एकूण ६ अनुदानित सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षात एकूण ६ विनाअनुदानित पदे मंजूर झाली आहे. तथापि, संच मान्यता पोर्टलवर सन २०२१-२२ च्या संच मान्यतेमध्ये तांत्रिक कारणाने एकूण ६ अंशत: अनुदानित व ३ विनाअनुदानित अशी एकूण ९ पदे मंजूर झालेली होती.

(३) सन २०१४-१५ च्या संच मान्यतेमधील शै.वर्ष २०१३-१४ मध्ये नमूद मंजूर पदांपेक्षा विविध शैक्षणिक वर्षामध्ये जादा पदे मंजूर झाली असल्याचे आढळून आल्याने अशा शाळांच्या संच मान्यता रिव्हर्ट करण्यात आल्या असून गत वर्षातील संच मान्यतेमध्ये मंजूर असलेल्या पदांच्या प्रमाणात संच मान्यता पुनश्च: जनरेट करण्यात आलेल्या आहेत.

त्यानुसार विद्यानिकेतन हायस्कूल, मार्वे रोड, मालाड (प), मुंबई या माध्यमिक शाळेच्या सन २०२१-२२ पासूनच्या संच मान्यता ऑनलाईन रिव्हर्ट करण्यात येवून सन २०२१-२२ पासूनच्या सर्व संच मान्यता पुनश्च: जनरेट करण्यात आलेल्या आहेत. सदर संच मान्यतेनुसार सदर शाळेस सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षात एकूण ६ विनाअनुदानित पदे मंजूर झाली आहेत.

सदर शाळेच्या सन २०१२-१३ ते सन २०१३-१४ च्या ऑफलाईन संच मान्यतेमध्ये ५ कायम विनाअनुदानित व १ मुख्याध्यापकासह ५.५ विनाअनुदानित पदे मंजूर आहेत. सन २०१४-१५ च्या ऑनलाईन संच मान्यता करतेवेळी संबंधितांनी माहीती नमूद करतेवळी १ मुख्याध्यापकासह एकूण ६ विनाअनुदानित पदे नमूद केलेली आहेत.

(४) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील होमिओपॅथी डॉक्टरांना ॲलोपॅथी प्रॅक्टीस करण्यास दिलेल्या निर्णयाबाबत

**(१८) ४८२८ (१४-१२-२०२५) श्री.कृपाल तुमाने, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.हेमंत पाटील, डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.जगन्नाथ अभ्यंकर :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलमध्ये सीसीपीएम अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या होमिओपथी डॉक्टरांची नोंदणी करण्यात येणार असल्याची माहिती माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एमबीबीएस अभ्यासक्रम हा ५.५ वर्षांचा असून त्यामध्ये १९ विषयांचा अभ्यास, क्लिनिकल अनुभव व एक वर्षाची अनिवार्य इंटर्नशिप समाविष्ट आहे, तर सीसीपीएम अभ्यासक्रम केवळ एका वर्षाचा असून आठवडयातून दोन दिवसांचे प्रशिक्षण असते, या शैक्षणिक असमानतेमुळे उपचाराच्या गुणवत्तेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले असल्याने, याबाबत शासनाने पुनर्विचार करावा, अशी मागणी राज्यभरातील इंडियन मेडिकल असोसिएशन शाखांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा डॉक्टरांना नोंदणी दिल्यास रुग्णांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होऊन चुकीचे निदान, डुप्लीकेट उपचार, अँटीबायोटिक रेसिस्टन्स आणि मृत्यूची शक्यता निर्माण होऊ शकते, तसेच दुहेरी वैद्यकीय प्रणाली तयार होऊन जनतेत गोंधळ, गैरसमज आणि अविश्वास पसरू शकतो याकरीता या निर्णयाविरुध्द १.८० लाख ॲलोपॅथी डॉक्टरांसह शासकीय निवासी डॉक्टरांनी दिनांक १८ सप्टेंबर,२०२५ रोजी एक दिवसाचा लाक्षणिक संप करुन निर्णय मागे घेण्यासाठी शासनाला ७ दिवसाची मुदत दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने राष्ट्रीय वैद्यकीय आयोग आणि राज्य वैद्यकीय परिषदेच्या नियमांचा पुनर्विचार करुन सीसीपीएम अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या होमिओपथी डॉक्टरांची नोंदणी करण्याच्या निर्णयाचा पुनर्विचार करण्याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०६-०३-२०२६) : (१)** होय,हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

(४) शासनाच्या व मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशानुसार नोंदणी बाबत प्रक्रिया परिषदेच्या स्तरावर सुरू असून अंतिम टप्प्यात आहे. तसेच सदर प्रकरण मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका ७८४७/२०१६ व ७८४६/२०१६ नुसार प्रलंबित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## घाटी रुग्णालय (जि.छत्रपती संभाजीनगर) येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील परिचर्या विद्यार्थ्यांकरीता नवीन परिचर्या महाविद्यालय व वसतिगृह उभारण्याबाबत

**(१९) ४८७६ (१४-१२-२०२५) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घाटी रुग्णालय (जि.छत्रपती संभाजीनगर) येथील बी.एस्सी/एम.एस्सी नर्सिंगचे महाविद्यालये असून त्याची प्रवेश क्षमता अनुक्रमे १०० व ३० अशी असतनाही सदर संस्थेस विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी स्वत:ची इमारत नाही तसेच निवासा करीता वसतिगृह नसल्याने जुन्या इमारतीत तात्पुरती व्यवस्था करण्यात आल्याचे माहे ऑक्टोंबर २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, इंडीयन नर्सिंग कौन्सीलच्या (आयएनसी) च्या निकषानुसार नर्सिंग कॉलेजसाठी स्वतंत्र इमारत व वसतिगृह आवश्यक असतनाही अशी व्यवस्था उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय बी.एस्सी/एम.एस्सी नर्सिंग कॉलेजसाठी स्वंतत्र इमारत व वसतिगृह बांधकामासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.हसन मुश्रीफ (०४-०३-२०२६) :** (१) हे खरे आहे,
सदर इमारत जुनी व जीर्ण होऊन मोडकळीस आल्यामुळे पाडण्यात आलेली आहे. परिचर्या महाविद्यालय तात्पुरत्या स्वरुपात नेफ्रोलॉजी वार्ड इमारतीमध्ये स्थलांतरीत करण्यात आले आहे. सद्य:स्थितीत ५० बी.एस्सी नर्सिंग विद्यार्थी अध्ययन घेत आहेत.
(२) हे खरे आहे.
(३) बी.एस्सी/एम.एस्सी नर्सिंग कॉलेजसाठी स्वतंत्र इमारत व वसतिगृह बांधकामासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, संभाजीनगर यांच्याकडे अंदाजपत्रक व आराखडा तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) लागू नाही.

---

## राज्यातील वैद्यकीय महाविद्यालयांत शिक्षक कल्याण समिती स्थापन करुन प्राध्यापकांना सेवाविषयक लाभ देण्याबाबत

**(२०) ५६०१ (१४-१२-२०२५) श्री.जयंत आसगावकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आयुर्वेद टीचर्स असोसिएशन गेल्या ५ वर्षापासून वैद्यकीय महाविद्यालयातील प्राध्यापकांना आश्वासीत प्रगती (career Advancement Scheame) योजना लागू व्हावी तसेच शिक्षक कल्याण समिती स्थापन व्हावी यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, उक्त योजना लागू करण्याबाबत व शिक्षकांचे व्यक्तिमत्व विकास साधण्याबरोबर आदी कल्याणकारी बाबींसाठी ही समिती फायदेशीर ठरणार असल्याने ही समिती स्थापन होण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही वा उपायोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०९-०३-२०२६) : (**१) व (२) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या शासन निर्णय दिनांक १२/०४/२०२२ अन्वये शासकीय वैद्यकीय, दंत व आयुर्वेद महाविद्यालयांतील अध्यापकांना Career Advancement Scheme लागू करण्यात आली आहे. खाजगी महाविद्यालयांमध्ये सदर योजना लागू करण्याची बाब राज्य शासनाच्या अखत्यारीत येत नाही. शिक्षक कल्याण समिती स्थापन करण्याची आवश्यकता महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ तपासून पाहील व त्याप्रमाणे उचित कार्यवाही करेल.
(३)प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.